**कृपया प्रसिध्दीसाठी** **4 जून 2010**

## पायधुणी पोलीस ठाण्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्मारक हवे : राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** पायधुणी पोलीस ठाण्यातील 'काळ कोठडीत' स्वातंत्र्यवीर सावरकर यांना बंदी म्हणून ठेवले गेले होते त्यामुळे सावरकरांच्या गौरवार्थ तिथे त्यांचे योग्य स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केली आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,"अलिकडेच मुंबई समाचार या गुजराती दैनिकात पायधुणी पोलीस ठाण्याबाबत विस्तृत माहिती देणारे वृत्त प्रसिध्द झाले होते. सदर वृत्तामुळे आजवर ज्ञात नसलेली माहिती उजेडात आली आहे. पायधुणी पोलीस ठाण्यातील एका अंधा-या कोठडीत ब्रिटीश सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांना ठेवले होते. 'काळ कोठडी' म्हणूनच ओळखली जाणारी ही खोली सध्या बंदच असते. रत्नागिरी कारागृहात स्वातंत्र्यवीरांना ज्या कोठडीत बंदी ठेवले गेले होते तिथे आता त्यांचे स्माारक सरकारने उभारले आहे. त्याच धर्तीवर पायधुणीतही सावरकरांचे योग्य स्मारक उभारावे." सावरकरांच्या 'सागरा प्राण तळमळला' या ऐतिहासिक गीताला तसेच त्यांच्या मार्सेलिस येथील ऐतिहासिक उडीला आता शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने पायधुणीत सावरकरांचे योग्य स्मारक सरकारतर्फे उभारण्यात यावे, अशी मागणी श्री. राम नाईक यांनी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

**(कार्यालय सचिव)**